# वसई विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

**प्रेस नोट** दि.२१/१०/२०२२

स्नेहा राज्य स्तरीय सामाजिक संस्थेव्दारे दिनांक १८/१०/२०२२ रोजी एकर्स क्लब, चेंबुर येथे सेव्हन पार्टनर्स कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम मा. डॉ. संजीव कुमार, अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई मनपा यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. मंगला गोमार, सहा. आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई मनपा, डॉ. दक्षा शहा, संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई मनपा, डॉ. अरमींडा फर्नाडीस, संस्थापक स्नेहा एनजीओ/ मा.अधिष्ठाता, सायन हॉस्पिटल, मिस वेनिसा डिसुजा- मुख्य कार्यकारी अधिकारी, स्नेहा एनजीओ आणि डॉ. शांती पंतवैद्य,कार्यकारी संचालक, स्नेहा एनजीओ यांचे उपस्थितीमध्ये दिपप्रज्वलन करुन उद्‌घाटन करण्यात आले.

सेव्हन पार्टनर्स यामध्ये मुंबई महानगर प्रदेशामधील सात महानगरपालिका म्हणजेच बृहन्मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, भिवंडी, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर यांचे वरिष्ठ अधिकारी, तज्ञ डॉक्टर्स व स्नेहा एनजीओ यांची उपस्थिती होती.

हया कार्यक्रमामध्ये पब्लिक सिस्टम पार्टनरशिप, मेटर्नल ॲन्ड चाईल्ड ॲन्ड लिंकेज या बद्दल सखोल चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या काही ठळक बाबींचे कौतुक डॉ. शांती पंतवैद्य यांनी केले. त्यात वसई विरार शहर महानगरपालिका यांचे सन २०१६-२०१७ मध्ये दोन रुग्णालय व ९ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे होती. सन २०२२ पर्यंत तब्बल ७ रुग्णालये २ माता-बाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५ दवाखाने कार्यरत असून प्रभावी प्रसुति पूर्व व प्रसुति पश्चात सेवा देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या या यशस्वी प्रगतीचे त्यांनी विशेष कौतुक केले. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने डॉ. गायत्री गोरख हयांनी महानगरपालिकेच्या कामकाज पद्धतीबाबत सादरीकरण केले.

स्नेहा एनजीओ यांना दिलेल्या उल्लेखनीय सहकार्याबद्दल वसई विरार शहर महानगरपालिकेचे उप.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. अनिरुद्ध भेले व नोडल अधिकारी, डॉ. गायत्री गोरख यांचा सन्मान करण्यात आला. तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या उपायुक्त- नयना ससाणे मॅडम आणि वैद्यकीय अधिकारी, डॉ. धनंजय विश्वकर्मा यांचा विशेष सहभाग लाभला. कार्यक्रमामध्ये गरोदर मातांचे योग्य प्रकारे संदर्भिकरण करणे, योग्य उपचार - माता मृत्युचे कमी प्रमाण, संदर्भित करण्याचे कमी प्रमाण याबाबत विशेष गौरव करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्यात आर.सी.एच. निर्देशांकामध्ये सर्व महानगरपालिकांमधून चौथा क्रमांक मिळविल्या बद्दल वसई विरार शहर महानगरपालिकेला गौरवित करण्यात आले.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या या यशामागे मा. आयुक्त, श्री. अनिलकुमार पवार यांचे मार्गदर्शन तसेच मा. अतिरिक्त आयुक्त, श्री. अजिंक्य बगाडे, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य), डॉ. विजयकुमार व्दासे, यांचे नेतृत्व आणि मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. भक्ती चौधरी, आर.सी.एच. अधिकारी, डॉ. अश्विनी माने यांचे सहकार्य लाभले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**